महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &
HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE- 411 005

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

| DIVISIONAL CHAIRMAN | IVISIONAL SECRETARY | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 25536712 (OFF) | |


क्रमांक पुविमं/ओ.2/खाजगी 6921
पुणे 411005
दिनांक 31/12/2024

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा/क.महाविद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

**विषय :— सन फेब्रु—मार्च 2025 करिता माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.10वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) करिता ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज विभागीय मंडळास ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत.**

**संदर्भ :—1.या कार्यालयाचे जा.क्र.पुविमं/खा.वि./ओ1/5383 दि.09/10/2024 चे पत्र**
**2.या कार्यालयाचे जा.क्र.पुविमं/खा.वि./ओ1/6484 दि.11/12/2024 चे पत्र**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) सन फेब्रु—मार्च 2025 करिता ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज शाळा व क. महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये दिसून येत आहे. सदर विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त झाले असेल तर मंडळ कार्यालयास तात्काळ ऑनलाईनरित्या पाठविण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते. **(सद्यस्थितीत शाळा व क.महाविद्यालय स्तरावर न पाठविलेल्या अर्जांची संख्या इ.10 वी— 279 व इ.12वी—336)** तसेच या कार्यालयास प्राप्त तथापि त्रुटीअभावी अपुर्ण असणा—या प्रस्तावांची त्रुटीपुर्ततेकरिता **(सद्यस्थितीत शाळा व क.महाविद्यालय स्तरावर अपुर्ण असलेली संख्या इ.10वी—705 व इ.12वी—905)** विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांची त्रुटीपुर्तता करून विहित मुदतीत मंडळ कार्यालयास सदरचे प्रस्ताव ऑनलाईनरित्या पाठविण्यात यावी. **सदरचे प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यास विद्यार्थ्यांच्या होणा—या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार राहाल.** याची नोंद घ्यावी.

**तसेच शाळेच्या/क. महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये ऑनलाईनरित्या प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रस्ताव हे मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त न झाल्यास व अपुर्ण प्रस्तावांच्या त्रुटीपुर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेल्या आपल्या शाळा/क.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लेखी किंवा एसएमएस द्वारे कळवून त्यांची नोंद आपल्या कार्यालयातील अभिलेखात जतन करून ठेवण्यात यावी.**

(औदुबंर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ 411005



Scanned with ACE Scanner